
ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2017

REVIEW OF RESEARCH

# महात्मा गांधी आणि समता व स्वातंत्र्य

डॉ. प्रल्हाद आश्रुजी गोरे
कै. बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय हिंगोली.



महात्मा गांधीचा जन्म 02–10–1869 रोजी पोरबंदर येथे झाला. त्यांचे संपुर्ण नांव मोहनदास करमचंद गांधी असे होते. राजकोट येथे प्राथमीक शिक्षण घेतल्यानंतर बॅरीस्टरची परीक्षा त्यांनी इंग्लंडला दिली. वकीली व्यवसायात ते रमु शकले नाहीत.1893 साली दक्षीण अफ्रिकेत व्यवसायानिमीत्त गेले असतांना तेथील वर्णभेद आणि भारतीयांना मिळणाऱ्या वागणुकीमुळे भारतातील जनतेला या प्रश्नासाठी एकत्रीत करण्याचा निश्चय केला. 1894 मध्ये एक संघटना स्थापन करून दक्षिण अफ्रिकेत कार्याला सुरूवात केली. त्यानंतर दांडी यात्रा, मिठाचा सत्याग्रह, भारत छोडो अशा अनेक चळवळी केल्या आणि ब्रिटीशांना हाकलण्यासाठी व देशाला स्वातंत्र मिळविण्यासाठी प्रंयत्न केले. अशा महान विचारवंताचा 30 जानेवारी 1948 रोजी खुन झाला.

## समता व स्वातंत्र्यः–

सामाजीक समता म्हणजे जाती–जमातीतील विषमता नाहीशी करणे, अस्पृश्यतेला मुठमाती देणे आणि सर्वधर्मसमभाव विकसीत करणे. भारतासारख्या विभिन्न धर्माचे, संप्रदायाचे व जातीजमातीचे आगार असलेल्या देशात इतर जातीसंबंधी व इतर धर्माविषयी स्नेहाची, आत्मीयतेची भावना निर्माण झाली नाहीतर या समाजाची अधोगती कोणी थांबवू शकणार नाही. हिंदु–मुस्लीम ऐक्याचे जे प्रयत्न गांधीजींनी केले त्यांच्याकडे याच विशाल दृष्टीकोणातून पाहिले पाहिजे. इंग्रजांना हाकलुन लावण्यापुरती ती संधीसाधु गटटी नव्हती. तर जीवन विकासाचे ते एक साधन होते. सर्वधर्म मुलतः निर्दोषच असतात. त्यांची तत्वे मुलतः एकच असतात. ही गोष्ट लोकांना पटवून देण्यासाठी त्यांनी जीवाचे रान केले आणि शेवटी त्यांच्या याच आग्रहापायी त्यांना बलिदान करावे लागले.

## स्वराज्य :–

गांधी म्हणतात राष्ट्रीय भाषा, राष्ट्रीय चारीत्र्य, राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रीय शिक्षणातून स्वातंत्र्याची प्राप्ती होवू शकते. या स्वातंत्र्याचे स्वरूप राजकीय, नैतीक आणि आध्यात्मीक असल्याचे दिसून येते. गांधींना अपेक्षीत स्वराज्य त्यांच्या सत्य–अहिंसेच्या कल्पनेचाच एक भाग आहे. ज्याप्रमाणे सत्य, अहिंसा प्राप्त करता येते, त्याच प्रमाणे राजकीय स्वातंत्र्य म्हणजेच स्वराज्याच्या प्राप्तीसाठी अखंडीत संघर्ष आणि कायम मेहनत करावी लागते. भारतीयांना स्वराज्य प्राप्तीचा हक्क प्राप्त झाला कारण, त्यांनी आतापर्यंत बरेचसे कष्ट आणि बराचसा संघर्ष केला होता. मिळणारे स्वातंत्र्य हे राजकीय, आर्थिक, सामाजीक असले पाहिजे. स्वराज्यात दलीत व इतरांचा संपुर्णपणे विचार करण्यात आला होता. नागरीकांच्या व्यक्तीगत आणि नागरी स्वातंत्र्याचा पुर्ण विचार केला जाईल. तसेच सर्वांना भाषण लेखन आदिंचे स्वतंत्र्य असेल, असे गांधी म्हणतात. सत्य आणि अहिंसात्मक साधनांव्दारेच पुर्ण स्वराज्याची निर्मिती होवू शकते.

**अस्पृश्यता :–**

अस्पृश्यता आणि वर्णाश्रमव्यवस्थेतील उच्च–निचतेचा गांधींनी धिक्कार केला असून या गोष्टीमुळे विषमता निर्माण होते, ज्याचा परिणाम विकासावर होतो. त्याचप्रमाणे अस्पृश्यता आणि सामाजीक भेदाभेद नष्ट करण्याचा प्रयत्न प्राचीन काळापासून होत आला आहे. नैतीक आणि मानवतेच्या दृष्टीकोणातुनही अस्पृश्यता अन्यायकारक असल्याचे दिसून येते. अस्पृश्यतेमुळे सामाजीक विघटन घडून आले. समाज शक्तीहीन बनला. ज्याचा परीणाम ब्रिटीशांच्या राज्य स्थापनेस सहाय्य मिळाले. अस्पृश्यता पाळणे हा सामाजीक गुन्हा ठरविण्यात यावा आणि ती पाळणाऱ्यास शिक्षा दिली जावी. 'यंग इंडीया' मधील 1920च्या एका लेखात स्वातंत्र्यास पात्र ठरणार नाहीत आणि स्वातंत्र्याची प्राप्ती झाली तरी अस्पृश्यतेच्या पालनाने त्यांचे संरक्षणही त्यांना करता येणार नाही. म्हणून हिंदू समाजावर असणारा हा कलंक धुवून टाकला पाहिजे. कारण कोणत्याच कारणावरून त्याचे समर्थनही करता येत नाही म्हणून गांधींनी अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी स्वतःच्या अनुयायाचा एक गटच तयार केला होता. यंग इंडिया व हरीजन आदितून गांधींनी आपली अस्पृश्यताविरोधी मोहीम चालविली होती. ते स्वतः हरिजनांच्या संपर्कात राहत. त्यांच्यावर होणारे अन्याय नष्ट करण्यासाठी ते नेहमीच तयार असत. अस्पृश्यता मानवनिर्मीत आहे, त्याचे समर्थन कोणत्याच धर्मग्रंथाने केलेले आढळून येत नाही. गांधी म्हणतात, ' मला जर पुन्हा जन्म घ्यावा लागला तर अस्पृश्य म्हणून जन्मास येईन, ज्यामुळे अस्पृश्यांच्या खऱ्या अत्याचाराची, दुःखाची जाणीव मला होईल. अस्पृश्यांना गांधी हरिजन शब्दाने संबोधीत ज्यामुळे पारंपारीक भावना नष्ट होईल, असे त्यांचे मत होते.'

**अस्पृश्यता नष्ट करण्याचे मार्ग :–**

गांधी म्हणतात अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी समाजाने हरिजनांना मंदीरात प्रवेश करू द्यावा. कारण मंदीरात प्रवेश करू दिल्यानेच त्यांच्या ठिकाणी आत्मविश्वास निर्माण होईल. हरिजन बालकांना संपुर्ण कुटुंबातून सांभळण्यात यावे, हरिजन मुलांना दत्तक घेण्यात यावे. अशा एका हरिजन बालकाला त्यांनी दत्तक घेतले होते. आंतरजातीय विवाह घडवून आणावेत, ज्यामुळे एकमेकांप्रती नाते निर्माण होवून प्रेम निर्माण होवू शकेल. जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी भिन्न वर्णात रोटी–बेटी व्यवहार करणे आवश्यक आहे.

**स्त्री स्वातंत्र्य :–**

समाजात स्त्रियांना असलेले कनिष्ठ स्थान गांधींना मान्य नव्हते. पुरूषांपेक्षा स्त्री शारिरीक आणि मानसीक दृष्टया दुर्बल असते हे त्यांना मान्य नव्हते. स्त्रियांना पुरेपूर स्वातंत्र्य दिले जावे, स्त्री पुरूषांचा दर्जा समान असावा, एवढेच नव्हेतर स्त्री–पुरूष एकमेकास पुरक असतात. प्रेम, त्याग, सेवा, अहिंसा आदिचा अभाव पुरूषांच्या ठिकाणी असतो. स्त्री म्हणजे पुरूषांची नैतीक शक्ती होय, तिला अबला म्हणने म्हणजेच तीचा आपमान करणे होय. स्त्रियांना स्वातंत्र्य न दिल्याने, त्यांच्या शक्तीचा वापर न केल्याने आपला समाज मागे पडला आहे. एवढेच नव्हे तर भारतीय स्त्रीवर होणारा अन्यायही आपल्यासाठी लाजीरवाणी गोष्ट आहे. भारताला आर्थिक आणि नैतीक समस्यातून वाट काढण्यासाठी भारतीय स्त्रीची मदत होवू शकेल; परंतु त्यासाठी मात्र आधी त्यांचे सामाजीक जीवन सुधारले पाहीजे. स्त्री जगाचा उध्दार करू शकेल, शांतता, सहजीवन निर्माण करण्याचे कार्य स्त्री करू शकेल, परंतु त्यासाठी जीवनातील सर्व क्षेत्रांचे ज्ञान त्यांना व्हावे. वास्तवीक पाहता स्त्रीवर बंधने टाकुन पुरूष आपले जीवन बंधनमय करीत आहे, आपल्या प्रगतीचा मार्ग बंद करीत आहेत असे गांधी म्हणतात. 1921 मध्ये यंग इंडियातील एका लेखात स्त्रीला उद्देशून गांधी लिहितात, ' भारताचे भवितव्य तुझ्या पायाशी आहे. भविष्यकाळाची निर्मिती तुझ्या हाती आहे. भारतासाठी शुर आणि धाडसी पुरूषांची निर्मिती तु करू शकतेस' परंतु त्यासाठी तिच्या विकासाची पुरेपुर काळजी घेतली पाहिजे. पडदा पध्दतीसारख्या पध्दती नष्ट करून तिला मोकळया वातावरणात आणले पाहिजे.

**निष्कर्ष :–**

1. महात्मा गांधींच्या प्रंयत्नाने देशाला स्वातंत्र्य मिळाले.
2. समाजातील अस्पृश्यता कमी हांवू लागली.
3. जातीवरील निर्बंध शिथील होवू लागले.
4. स्त्रियांना स्वातंत्र्य मिळू लागले
5. आर्थिक बाबतीत महिला सक्षम होवू लागल्या

## संदर्भग्रंथ सुची :–


1. श्रीपाद जोंशी – महात्मा गांधी जीवन आणि शिकवण
2. प्रा. किसन चोपडे – भारतीय राजकीय विचार
3. वि.ग. कानिटकर – धर्म महात्मा गांधींचा आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांचा
4. अरूण सारथी – शोध महात्मा गांधीचा ;खंड 1–2